# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## अभिवेदन (Representation) क्रमांक १६५ / २०२४

### वीज जोडणी देण्यास उशीर झाल्याबद्दल नुकसानभरपाई मिळण्याबाबत

श्री. प्रकाश चांगदेव मुरादे ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादीत संगमनेर (महावितरण) ...................................................... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १) राहूल मुरादे
२) अंबादास पवार, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- अनिल थोरात, कार्यकारी अभियंता, संगमनेर

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १४ जानेवारी २०२५

आदेश पारित दिनांक :- १५ जानेवारी २०२५

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण नाशिक परिमंडळ (मंच) यांच्या दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या आदेशाविरूध्द सदरचे अभिवेदन दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ २०२४ आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

*"१) ग्राहकाची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.*

*२) वीज कायदा 2003 कलम ४३ (३) नुसार (३० दिवसानंतर) म्हणजे पहिल्या ३१ व्या दिवसापासून वीज कनेक्शन दिलेल्या तारखे पर्यंत रु.५००/- प्रतिदिन या प्रमाणे नुकसान भरपाई द्यावी.*

*३) सहाय्यक अभियंता ज्यानी पुरवठा मिळण्यास पोल टाकावे लागतील असा शेरा ग्राहकाच्या अर्जावर दिला त्याच्या वर नियमानुसार कारवाई करण्यात यावी."*

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजीच्या झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी श्री. प्रकाश चांगदेव मुरादे यांनी मौजे खडकदेवाळा, तालूका राहता, जिल्हा अहमदनगर (ग्राहक क्र.०१६५५०००४५४१) दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी महावितरण कार्यालयाकडे घरगुती वीज जोडणीसाठी महावितरणच्या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज दाखल केला व प्रोसेसिंग फी रु.१४२/- चा भरणा केला. त्यानंतर महावितरणने अपिलार्थीस दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी रु.६११८/- चे कोटेशन दिले व अपिलार्थीने सदर कोटेशनचा भरणा दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी केला.

- महावितरण कार्यालय राहता सेक्शन यांच्याकडे वीज जोडणी अर्जाबाबत चौकशी केली असता, वीज जोडणीसाठी अपिलार्थीस रु.१७०००/- चा खर्च येईल असे तोंडी सांगण्यात आले. तसेच, सदर जागेची स्थळ तपासणी केली असून चालु लघुदाब वाहिनीचे पोल पासूनचे अंतर २०० फुट आहे; तरी, आपण सरकारी कंत्राटदाराकडून एका पोलचे कामाची मंजूरी घेऊन काम करून द्यावे. त्यानंतरच आपली वीज जोडणी होईल याची नोद घ्यावी असा लेखी शेरा सहाय्यक अभियंता यांनी अपिलार्थीच्या अर्जावर केला होता.

- महावितरणकडून सुचविण्यात आलेली पायाभूत सुविधा निर्मिती करण्याची सुचना गैरकायदेशीर आहे. तसेच ग्राहकाने स्वतःहून मागणी केल्याशिवाय पायाभूत सुविधांचा खर्च करण्यास कंपनी ग्राहकावर दबाव आणू शकत नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- वीज कायदा २००३ च्या सदर कलमाच्या अधिन राहून माननीय महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने विद्युत परवाने धारकाच्या कृतीची मानके अधिसुचित केली आहेत. त्यानुसार महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीचे मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम २०२१ (विद्युत पुरवठा संहिता, कृतीचे मानके पॉवर क्वालिटी विनियम २०२१) मधील विनियम ५.८ नुसार अर्जदाराने कोटेशन रक्कमेचा भरणा केलेल्या दिनांकापासून ३० दिवसात वीज जोडणी देणे बंधनकारक आहे. मात्र, अपिलार्थीस दिनांक क ३ नोव्हेंबर २०२३ रोजी वीज पुरवठा देण्यात आला, म्हणजे ३७ दिवसाने (७ दिवस उशीराने) वीज जोडणी देण्यात आली. मंचाने त्यांच्या दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ च्या आदेशान्वये याबाबत योग्य ते निर्देश दिले. तथापि सदर निर्देश महावितरणने अंमलात आणले नाहीत.

- दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी अभिवेदन मा. विद्युत लोकपाल यांचे कार्यालयात दाखल केल्यानंतरच प्रतिवादी महावितरणने दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी मंचाच्या आदेशाची अंमलबजावणी केली. ही बाब खेदाची आहे.

- वरील सर्व बाबी लक्षात घेऊन अपिलार्थीस योग्य तो न्याय दयावा, ही विनंती.

३. प्रतिवादीने दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी दाखल केलेल्या त्यांच्या उत्तरातील व दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थीने दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी महावितरण कार्यालयामध्ये मौजे खडकदेवाळा, येथे नवीन घरगुती वीज जोडणीसाठी महावितरणच्या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज दाखल केला. महावितरणने दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी रू.६११८/- चे कोटेशन अपिलार्थीस दिले व अपिलार्थीने सदर कोटेशनचा भरणा त्याच दिवशी म्हणजे दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी केला.

- प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थींना प्रथम गावठाण फिडरवरील ठराविक रोहीत्रावरून वीज जोडणी पाहीजे होती, ते अंतर २०० फुट (म्हणजे १ पोलचे) होते. म्हणून एक पोलच्या कामाबाबत अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीने नंतर कोणत्याही ११ केव्ही कृषी फिडरवरील रोहीत्रावरून वीज जोडणी दिली तरी चालेल अशी संमती दर्शविली म्हणून पहिला विषय बंद करण्यात आला होता.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- ग्राहकाने नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केल्यानंतर १ महिन्याच्या आत वीज जोडणी देणे वीज वितरण कंपनीस बंधनकारक आहे, याची महावितरणला जाणीव आहे. सदर वीज जोडणी दिनांक ३ नोव्हेंबर २०२३ रोजी म्हणजे ७ दिवस उशीराने दिली.

- त्याबाबत ग्राहकाने दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ रोजी मंचाकडे गाऱ्हाणे दाखल केले. मंचाने दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ च्या आदेशाने रू.५००/- प्रतिदिन प्रमाणे नुकसान भरपाईचे आदेश दिले (वस्तूतः एक आठवडा उशीरासाठी रू. ५०/- इतके विद्युत पुरवठा संहिता, कृतीचे मानके पॉवर क्वालिटी विनियम २०२१ नुसार देय होते. तथापि मंचाने रू.५००/- प्रतिदिन प्रमाणे नुकसान भरपाईचे आदेश दिले). सदर नुकसान भरपाईबाबत वरिष्ठांशी सल्ला मसलत करून विलंबासाठीचे रू.५००/- प्रतिदिन नुसार रू.३५००/- ची नुकसान भरपाई वीज देयकात दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी समायोजित करून देण्यात आले. अश्या प्रकारे मंचाच्या आदेशाचे पालन केले. तसेच मंचाच्या आदेशानुसार सहाय्यक अभियंताविरूध्द योग्य ती कारवाई देखील करण्यात आली आहे.

- दरम्यानच्या कालावधीत अपिलार्थीने माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयात अभिवेदन दाखल केले. वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीच्या गाऱ्हाण्याचा मुळ तक्रारीच्या मुद्दयाचे अनुपालन केले आहे. सबब, अपिलार्थीचे अभिवेदन नामंजूर करण्यात यावे ही विनंती.

**विश्लेषण व निर्णय**

४. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी श्री. प्रकाश चांगदेव मुरादे यांनी दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी महावितरण कार्यालयाकडे घरगुती वीज जोडणीसाठी ऑनलाईन अर्ज केला. त्यानंतर महावितरणने दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी रू.६११८/- चे कोटेशन अपिलार्थीस दिल्यानंतर सदर कोटेशनचा भरणा दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी केला. अपिलार्थीस वीज जोडणी दिनांक ३ नोव्हेंबर २०२३ रोजी देण्यात आली. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थीस वीज जोडणी ७ दिवस विलंबाने देण्यात आली. सदर उशीराच्या कालावधीसाठी नुकसान भरपाई मिळण्यासाठी सदर गाऱ्हाणे मंचाकडे दाखल केले. मंचाने, अपिलार्थीस विलंबापोटी रू.५००/- प्रतिदिनानुसार भरपाई देण्याचे निर्देश दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी देण्यात आले. मंचाच्या

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आली. मंचाच्या आदेशानुसार विलंबासाठीचे रु.५००/- प्रतिदिन नुसार रु.३५००/- ची नुकसान भरपाई वीज देयकात समायोजित करून देण्यात आली असून मंचाच्या आदेशाचे पालन केले आहे. तसेच, मंचाच्या आदेशानुसार सहाय्यक अभियंताविरूध्द योग्य ती कारवाई देखील करण्यात आली आहे.

६. अपिलार्थींच्या तक्रारीचे मुख्य कारण आधीच सोडविले गेले आहे; सबब, अपिलार्थीच्या गाऱ्हाण्यावर मंचाच्या आदेशानुसार योग्य ती कार्यवाही प्रतिवादीने केली असल्यामुळे अपिलार्थींचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.